# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 07/09/2017

**प्रेस नोट**

**प्रोझोन मॉलचे पार्किंगविरुद्ध अवैध पार्किंग शुल्क वसुली प्रकरणी गुन्हा दाखल.**

दि. 07.09.2017- शहरात काही ठिकाणी बेकायदेशीर पार्किंग शुल्क जनतेकडून वसूल करण्यात येत असलेबाबत अनेक नागरिकांच्या तक्रारी पोलीस आयुक्त श्री. यशस्वी यादव यांच्याकडे आल्या होत्या. त्यावरून पोलीस आयुक्त यांनी दिलेल्या आदेशानुसार औरंगाबाद शहरातील अनेक सार्वजनिक पार्किंगबद्दल आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी करण्यात आली आहे. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्रीकांत नवले यांनी प्रोझोन मॉल येथे दि. 31.08.2017 रोजी जाऊन चौकशी केली असता प्रोझोन मॉलने (इम्पेरिअल मॉल प्रा.लि.) वाहन पार्किंगकरिता सेक्युलर पार्किंग सोल्युशन प्रा.लि. सोबत करार केला असल्याचे समजले. त्यानुसार ते प्रोझोन मॉलमध्ये येणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहन धारकाकडून 20 ते 25 रुपये प्रमाणे शुल्क वसूल करीत असल्याचे समजून आले. या पार्किंग मालकास वाहनधारक तथा ग्राहकांकडून पार्किंग शुल्क वसूल करण्याचा कोणताही अधिकार नसताना, पार्किंग परवाना नसताना अवैधरीत्या पार्किंग शुल्क वसूल करीत असल्याचे दिसून आले. ग्राहकांना देण्यात येणाऱ्या पार्किंग पावतीवर वसूल करणाऱ्याचे नाव किवा इतर माहिती नाही तसेच त्या पावतीवर सेवा कर किंवा GST नंबर नसल्याचे आढळून आले. चौकशीअंती पो.नि. श्रीकांत नवले, आर्थिक गुन्हे शाखा यांनी सरकारतर्फे फिर्यादी होऊन पो.स्टे. MIDC सिडको येथे सेक्युलर पार्किंग सोल्युशन प्रा.लि. यांच्याविरुद्ध ते अवैधरीत्या पार्किंग शुल्क वसूल करून शासनाचे आदेश नियम डावलून जनतेची फसवणूक करीत असल्याबाबत पो.स्टे. MIDC सिडको गु.र.न. 295/17 कलम 418, 420,188 भा.द.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेचे सपोनि. ए. व्ही. सातोदकर हे करीत आहे. इतर पार्किंगचे परवाना व कागदपत्रांबाबत चौकशी चालू असून अवैध पार्किंगविरुद्ध आणखी गुन्हे दाखल करण्यात असल्याचे आर्थिक गुन्हे शाखेतर्फे कळविण्यात आले आहे.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 07/09/2017

**<u>प्रेस नोट</u>**

## चिली ड्रोन कॅमेऱ्याचे पेटंटची नोंदणी

दि. 07.09.2017- औरंगाबाद शहराचे पोलीस आयुक्त यांची अभिनव संकल्पना असलेले चिली ड्रोन कॅमेरा कायदा व सुव्यवस्था राखणे व वाहतूक नियमन या कामाकरिता औरंगाबाद शहर पोलीस दलाचे ताफ्यात समाविष्ट झाले आहेत.

चिली ड्रोन कॅमेऱ्याद्वारे बेकायदेशीर जमाव पांगविण्याचे तंत्र हे बौद्धिक संपदा अधिकार (Intellectual Property Rights) म्हणून त्याचे पेटंट साठी पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर यांनी जनरल कंट्रोलर ऑफ पेटंट कार्यालय यांच्याकडे पेटंट अधिनियमानुसार केलेल्या अर्जानुसार बेकायदेशीर जमावाचे नियंत्रणाकरिता चिली ड्रोन कॅमेऱ्याच्या वापराचे तंत्राचे पेटंट नोंदणीकृत करण्यात आले आहे.

कोणत्याही नाविन्यपूर्ण उपकरण अथवा तंत्राचा शोध लावणारे व्यक्तीस त्याबाबत बौद्धिक संपदा अधिकार प्राप्त होतात. पेटंट कायद्यानुसार बौद्धिक संपदा अधिकार प्राप्त संशोधनाचा इतर व्यक्ती अथवा संस्थांनी वापर करण्यापूर्वी पेटंट मिळविणाऱ्या कडून पूर्व परवानगी घेऊन त्यास बौद्धिक संपदा अधिकाराबाबत रॉयल्टी द्यावी लागते.

चिली ड्रोन कॅमेऱ्याचे तंत्राचे पेटंटची नोंदणी हि औरंगाबाद शहर पोलीस दलासाठी अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. बेकायदेशीर जमावाचे नियंत्रणासाठीचे हे आधुनिक तंत्र इतर घटकांना किंवा संस्थांनी वापरण्यापूर्वी पोलीस आयुक्तालय औरंगाबाद शहर यांची संमती घ्यावी लागणार आहे.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 07/09/2017

**प्रेस नोट**

## कंपनी फोडणारे चोर गुन्हे शाखेने केले जेरबंद.

दि. 07.09.2017- MIDC चिकलठाणा मधील GM इंटरप्राइझेस कंपनी दि. 02.09.2017 रोजी रात्रीच्या सुमारास फोडणारे अज्ञात चोरटे गुन्हे शाखेने तात्काळ पकडले. अनिल भावलाल गायकवाड, वय-30 वर्ष, रा. राधास्वामी कॉलनी आणि जब्बार शहा मुसा शहा वय- 23 वर्ष रा. आंबेडकरनगर असे पकडण्यात आलेल्या आरोपींचे नावे आहेत.

दि. 02.09.2017 रोजी रात्रीच्या सुमारास GM इंटरप्राइझेस कंपनीचे शटर कोणीतरी अज्ञात चोरट्याने उचकटून कंपनीतून 2,34,000/- रु. किंमतीचे कॉपर बेरिंग चोरून नेले होते. या गुन्हयात गुन्हे शाखेने अज्ञात आरोपी व गेला मालाची माहिती काढत असतांना दि. 06.09.2017 रोजी गुन्हे शाखेला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीलायक बातमी मिळाली कि GM इंटरप्राइझेस कंपनी मध्ये अनिल गायकवाड व जब्बार शहा यांनी चोरी केली आहे. ह्या माहितीवरून सपोनि. घनश्याम सोनवणे व त्यांच्या पथकाने तपासाची चक्रे फिरवून आरोपींचा शोध घेऊन आंबेडकर नगर चौकात छापा टाकून दुचाकीसह अनिल गायकवाड व जब्बार शहा यांना पकडले. त्यांना अधिक विचारपूस केली असता त्यांनी 5 दिवसांपूर्वी दुचाकीवर बसून जाऊन चिकलठाणा MIDC मधील GM इंटरप्राइझेस कंपनीत चोरी केल्याची कबुली दिली व कंपनीतून चोरी केलेला माल कॉपर बेरिंग व बार हे माजीद खान उर्फ मज्जू पिता सरदार रा. कैसर कॉलनी औरंगाबाद यास विक्री केल्याचे सांगितले. त्यावरून तीनही आरोपी अनिल गायकवाड, जब्बार शहा व माजीद खान उर्फ मज्जू ताब्यात घेऊन व चोरी करण्यासाठी वापरलेली 30,000/- रु. किंमतीची मोटारसायकल गुन्हे शाखेने जप्त केली आहे.

पुढील तपासकामी आरोपींना मुद्देमालासह MIDC सिडको पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक मधुकर सावंत, सपोनि घनश्याम सोनवणे, पोलीस हवालदार संतोष सोनवणे, पोना. विजयानंद गवळी, सुधाकर राठोड, पोकॉ. योगेश गुप्ता, सिद्धार्थ थोरात, लालखा पठाण, नंदलाल चव्हाण, नितीन धुळे, हिरासिंग राजपूत, यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)

दि. 07/09/2017

**प्रेस नोट**

## मिलिंद कॉलेज येथील संगणक चोरीचा गुन्हा उघड.

दि. 07.09.2017- गुन्हे शाखेस मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे मिलिंद कॉलेज येथील संगणक व CCTV कॅमेरे चोरणाऱ्या अज्ञात आरोपीतांना पकडण्यात यश प्राप्त झाले आहे. शेख अशफाक शेख अन्वर, रा. जय भीमनगर व बाबासाहेब उर्फ गजानन भवानी उपळकर, रा. भानुदासनगर औरंगाबाद असे आरोपींचे नावे असून त्यांच्याकडून 29,000/- रु, किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. आज रोजी गुन्हे शाखेचे सपोनि. अजबसिंग जारवाल व स्टाफ हे आयुक्तालय हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारमार्फत बातमी मिळाली कि, एका गजानन नावाच्या मुलाने त्याच्या साथीदारासोबत कोठूणतरी संगणक चोरले असून तो जालना रोड वरील अमरप्रीत हॉटेल समोरील चहाच्या हॉटेलवर काम करतो अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून गुन्हे शाखेच्या पथकाने त्यास त्याठिकाणी पोहचून गजानन नावाच्या मुलाची विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव बाबासाहेब उर्फ गजानन भवानी उपळकर, रा. उंडणगाव ता. सिल्लोड ह.मु. भानुदासनगर असे सांगून शेख अशफाक याच्या सोबत साडे तीन ते चार महिन्यापूर्वी मिलिंद कॉलेजच्या बिल्डींगमधून संगणक व CCTV कॅमेरे चोरले होते. अशी कबुली दिली असून शेख अशफाक याच्या कडून एक HCL कंपनीचा CPU व दोन HCL कंपनीचे मोनीटर असा एकूण 29000/- रु किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दोन्ही आरोपी व मुद्देमाल पोलीस स्टेशन छावणी येथे गु.र.न.143/17 कलम 461 भा.द.वि. च्या तपास कामी ताब्यात दिले आहे. हि कामगिरी सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे) रामेश्वर थोरात, पोलीस निरीक्षक(गुन्हे) मधुकर सावंत, सहा.पोलीस निरीक्षक अजबसिंग जारवाल, पोना/विलास वाघ, विशाल सोनवणे, रवी दाबडे, प्रभाकर राऊत, गजानन मान्ते, देवचंद महेर, सुनील धात्रट, सुनेश कुसाळे यांनी केली.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 07/09/2017

## प्रेस नोट

**हर्सूल येथील नागरिकांशी पोलीस आयुक्त यांचा थेट संवाद-जागीच केले तक्रारीचे निवारण**

दि.07/09/2017:- पोलीस आयुक्त श्री.यशस्वी यादव यांनी औरंगाबाद शहर आयुक्तालयाचा पदभार घेतल्या पासून जनतेशी थेट संपर्क साधने करिता शहरातील सर्व पोलीस ठाणेस “ नागरिक व पोलीस संमेलन ” हि नाविन्यपूर्ण संकल्पना सुरु केली आहे. या मध्ये पोलीस आयुक्त हे थेट जनतेशी सवांद साधून जनतेच्या तक्रारीचे जागीच निवारण करीत असतात.

या नाविन्यपूर्ण योजनेचा एक टप्पा म्हणून आज रोजी हर्सूल पोलीस स्टेशन येथे नागरीक व पोलीस संमेलन हर्सूल पोलीस स्टेशन ठाणेचे बाजूच्या ज्योती विद्यामंदिर प्राथमिक शाळा प्रांगणातील खुले सभागृहात दुपारी 1.30 ते 2.30 या वेळेत आयोजित करण्यात आले होते. या जनता निवारण सभेची सुरुवात मान्यवरांच्या स्वागतांनी झाली. स्वागता नंतर परिमंडळ II पोलीस उप आयुक्त राहुल श्रीरामे यांनी प्रास्ताविक करीत हर्सूल पोलीस स्टेशनची स्थापना, हर्सूलची भौगोलिक माहिती देत पोलीस आयुक्त श्री. यशस्वी यादव यांनी सुरु केलेल्या विशेष पोलीस अधिकारी, चिली ड्रोन कॅमेरा, CCTV यामुळे औरंगाबाद पोलीस आयुक्तालय हे आधुनिक होवून गेल्या तीन महिन्यामध्ये मालमत्तेविरुद्धच्या गुन्ह्यात कमालीची घट झाल्याचे सांगितले.

या नंतर पोलीस आयुक्त श्री.यशस्वी यादव यांनी उपस्थित जनतेशी हितगुज करीत थेट संपर्क साधून त्यांना पोलीस व्यवस्थेचे आधुनिकीकरण किती जरुरी आहे व ते आता होत असल्याने गुन्ह्याचे प्रमाण कमी होत असून गुन्हेगारावर वचक होत असल्याचे सांगितले. त्यावर उपस्थित हर्सूलवासियांनी प्रचंड टाळ्यांच्या कडकडाट दाद दिली. जनता तक्रार निवारण संमेलनामुळे जनतेशी जनतेशी थेट संपर्क होत असल्याने यांच्या हाताखालील अधिकारी व कर्मचारी जबाबदारीने चांगले काम करीत आहे. हर्सूल ठाणेदारचे काम चांगले आहे का असा उपस्थितांना केलेल्या प्रश्नाला सर्वांनी हो म्हणून दाद दिली. या संमेलनामध्ये 11 नागरिकांच्या तक्रारीचे जागीच पोलीस आयुक्त यांनी निवारण करून कार्यवाही करण्याचे आदेश दिले. विशेष पोलीस अधिकारी यांनी गणेश विसर्जन मिरवणुकी मध्ये चागल्या प्रकारे काम केल्याने त्यांचे कौतुकही केले. यानंतर पोलीस स्टेशनच्या पाहणी करून कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले.

या कार्यक्रमास पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) डॉ.दिपाली धाटे-घाडगे, पोलीस उप आयुक्त (परिमंडळ II) राहुल श्रीरामे, सहा. पोलीस आयुक्त(सिडको) डॉ.नागनाथ कोडे, पोलीस निरीक्षक मनीष कल्याणकर, हर्सूल पोलीस स्टेशनचे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

# पोलीस आयुक्तालय, औरंगाबाद शहर

डॉ.बा.आं.मार्ग, मिल कॉर्नर, औरंगाबाद शहर-४३१००१ (महाराष्ट्र)


दि. 07/09/2017

## प्रेस नोट

**MIDC सिडको पोलिसांनी हरवलेला मोबाईल शोधला अवघ्या एक तासांत.**

दि. 07.09.2017:- सतीश पंडित म्हस्के रा. इंदिरानगर हे आज रोजी सिडको बस स्थानक येथे कामानिमित्त आले असता त्याठिकाणी त्यांचा 12,000 /- रु. किंमतीचा मोबाईल पडून गहाळ झाल्यामुळे त्यांनी तात्काळ MIDC सिडको पोलीस ठाणे गाठून पोलीस निरीक्षक श्रीपाद परोपकारी यांना घडलेल्या घटनेची माहिती दिली. त्यावर पो.नि. परोपकारी यांनी तात्काळ त्यांच्या पथकास मोबाईल शोधण्याचे आदेश दिले. तांत्रिक माहितीच्या आधारे गहाळ झालेला मोबाईल मिळून आल्याने पोलीस निरीक्षक श्रीपाद परोपकारी यांनी तक्रारदार सतीश पंडित म्हस्के यांना 12,000/- रु. किंमतीचा मोबाईल फोन परत केला. अवघ्या एका तासांत आपला गहाळ झालेला मोबाईल पोलिसांनी शोधून परत केल्याने सतीश म्हस्के यांनी पोलिसांचे आभार मानले.

**स्वाक्षरीत/-**

(रामेश्वर थोरात)
सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे)
औरंगाबाद शहर